| Sl No | Particulars | Pre Buyback as on the date of public Announcement | | Post Buyback | |
|---|---|---|---|---|---|
| | | No. of Shares | Amount (Rs.) | No. of Shares | Amount (Rs.) |
| 1 | Authorised Share Capital | 33250000 Equity Shares of Rs. 10/- each | 33,25,00,000 | 33250000 Equity Shares of Rs. 10/- each | 33,25,00,000 |
| 2 | Issued, subscribed and fully paid- up share capital | 32607699 Equity Shares of Rs. 10/- each* | 32,60,76,990 | 31932706 Equity Shares of Rs. 10/- each | 31,93,27,060 |

*As on the date of Post PA, the Issued, subscribed and fully paid- up share capital of the Company does not include 45201 Equity Shares of Rs. 10/- each issued and allotted to Ramkrishna Forgings Limited Employee Welfare Trust under Ramkrishna Forgings Limited - Employee Stock Option Plan 2015.

3.2. The shareholding pattern of the Company, pre Buy-back and post Buy-back, is as under:

| Particulars | Pre Buyback | | Post Buyback | |
|---|---|---|---|---|
| | No. of equity shares | % of Pre-Buyback equity share capital | No. of equity shares | % of Pre-Buyback equity share capital |
| (A) Promoters and Promoters Group: | 14665794 | 44.91 | 14665794 | 45.86 |
| (B) Public: | 17840692 | 54.64 | 17165699 | 53.68 |
| (C) Non Promoter- Non Public | | | | |
| (C1) Shares underlying DRs | 0 | 0.00 | 0 | 0.00 |
| (C2) Shares held by Employee Trusts | 146414 | 0.45 | 146414 | 0.46 |
| (C= C1+C2) | 146414 | 0.45 | 146414 | 0.46 |
| Total | 32652900 | 100.00 | 31977907 | 100.00 |

4. **MANAGER TO THE BUYBACK:**

**VC Corporate Advisors Private Limited**
CIN: U67120WB2005PTC106051
SEBI REGN. NO.: INM000011096
Validity of Registration: Permanent
(Contact Person: Ms. Urvi Belani/ Mr. Premjeet Singh)
31, Ganesh Chandra Avenue, 2nd Floor, Suite No. -2C, Kolkata-700 013
Tel. No.: 033- 2225 3940 , Fax No.: 033 2225 3941
Email Id: mail@vccorporate.com , Website: www.vccorporate.com

5. **DIRECTORS' RESPONSIBILITY:**

As per Regulation 24(1)(a) of the Buyback Regulations, the Board accepts responsibility for the information contained in this Post Buyback Public Announcement and confirms that such document contains true, factual and material information and does not contain any misleading information

**For and on behalf of the Board of Directors of Ramkrishna Forgings Limited**

| Sd/- | Sd/- | Sd/- |
|---|---|---|
| NareshJalan | Mahabir Prasad Jalan | Mr. Rajesh Mundhra |
| Managing Director | Chairman and Whole Time Director | Company Secretary & Compliance Officer |
| DIN: 00375462 | DIN: 00354690 | |

**Place: Kolkata** **Date: 26.09.2020**

## प्रत्येकाला लस देण्यासाठी ८० हजार कोटी आहेत का?

### आदर पूनावाला यांचा सवाल

**पुणे :** देशातील प्रत्येक नागरिकाला करोना प्रतिबंधक लस उपलब्ध करून देण्यासाठी सरकारच्या तिजोरीत पुढील वर्षापर्यंत ८० हजार कोटी रुपये उपलब्ध होणार आहेत का, असा प्रश्न सीरम इन्स्टिट्यूटचे मुख्य कार्यकारी अधिकारी आदर पूनावाला यांनी ट्विटर द्वारे उपस्थित केला आहे. येत्या काळात या प्रमुख आव्हानाचा सामना आपल्याला करायचा असल्याचेही पूनावाला यांनी आपल्या ट्विटमध्ये म्हटले आहे.

देशातील प्रत्येक व्यक्तीला लस द्यायची असेल, तर त्यासाठी ८० हजार कोटींची गरज आहे. केंद्राच्या आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्रालयाची तेवढी तयारी आहे का, हे पाहणे महत्त्वाचे आहे. कारण त्याप्रमाणे देशातील आणि परदेशातील लस उत्पादकांना खरेदी आणि वितरण यांबाबतच्या सूचना देणे आवश्यक असल्यामुळे हा प्रश्न उपस्थित करणे महत्त्वाचे वाटते, असेही पूनावाला यांनी नमूद केले आहे.

ऑक्सफर्ड विद्यापीठ, अॅस्ट्राझेन्का आणि सीरम इन्स्टिट्यूट यांच्यातील सामंजस्य करारातून तयार होत असलेल्या कोव्हिशिल्ड या लशीच्या दुसऱ्या टप्प्यातील मानवी चाचण्यांची सुरुवात २६ ऑगस्ट पासून पुण्यात झाली. तर २१ सप्टेंबरपासून देशात तिसऱ्या टप्प्यातील मानवी चाचण्यांची प्रक्रियाही सुरू झाली आहे. तिसऱ्या टप्प्यातील चाचण्यांचे निष्कर्ष समाधानकारक आले, तर २०२१ च्या पूर्वार्धात लस बाजारात येण्याची शक्यता आहे. त्या पार्श्वभूमीवर पूनावाला यांचे हे ट्वीट महत्त्वाचे आहे.

### मार्गदर्शक सूचनांनुसार उपचार देण्याचा तज्ज्ञांचा सल्ला

# गंभीर रुग्णांना रक्तद्रव उपचार फायदेशीर नाही

**शैलजा तिवले / इंद्रायणी नार्वेकर, लोकसत्ता**

**मुंबई :** गंभीर प्रकृतीच्या किंवा कृत्रिम श्वसनयंत्रणेवरील करोनाबाधित रुग्णांना रक्तद्रव (प्लाझ्मा) उपचार विशेष फायदेशीर नाही. योग्य रुग्णावर योग्य वेळी याचा वापर केल्यास निश्चित फायदा आहे, अन्यथा त्याचे दुष्परिणाम होण्याचा धोका असल्याचे मत तज्ज्ञ डॉक्टरांनी व्यक्त केले आहे.

एकीकडे मृत्युदर कमी होणे किंवा रुग्णांची प्रकृती सुधारण्यास रक्तद्रव उपचाराने मदत होत नसल्याचे भारतीय संशोधन परिषदेने नुकतेच स्पष्ट केले आहे. दुसरीकडे मात्र रक्तद्रवाची मागणी वाढली असून, समाजमाध्यमांवर याबाबत अनेक संदेश फिरत आहेत. विशेष म्हणजे मुंबईपेक्षा महानगर आणि बाहेरील जिल्ह्यांतून अधिक मागणी आहे.

अनेक ठिकाणी गंभीर रुग्णांना किंवा कोणत्याही औषधोपचारांना प्रतिसाद न देणाऱ्या किंवा कृत्रिम श्वसनयंत्रणेवरील रुग्णांवर खासगी रुग्णालयांत रक्तद्रव उपचार पद्धतीचा अधिकतर वापर केला जात असल्याचे निदर्शनास आले आहे.

**निकष असे...**

मध्यम प्रकृतीच्या रुग्णांना मार्गदर्शक सूचीनुसार 'स्टिरॉईड'सह औषधोपचार देऊनही बाहेरील ऑक्सिजनची आवश्यकता भासत असल्यास रक्तद्रव उपचार द्यावेत. गरोदर किंवा स्तनपान करत असलेल्या महिलेला रक्तद्रव उपचार देऊ नयेत. अतिगंभीर रुग्णाला आणि रक्ताशी संबंधित अलर्जी असल्यास किंवा गेल्या ३० दिवसांत रुग्णाला 'इम्युनोग्लोब्युलिन्स' दिले असल्यास हे उपचार देऊ नये, असे निकष ठरविण्यात आल्याचे पालिका रुग्णालयाचे संचालक डॉ. रमेश भारमल यांनी सांगितले.

**फायदा कोणास? :** रक्तातील ऑक्सिजनचे प्रमाण आणि बाहेरून द्यावा लागणाऱ्या ऑक्सिजनचे प्रमाण २०० ते १५० च्या खाली असेल, अशाच रुग्णांना रक्तद्रव उपचार फायदेशीर असल्याचे आढळत आहे. रुग्ण कृत्रिम श्वसनयंत्रणेवर जाऊ नये यासाठी रक्तद्रव हा पर्यायी उपचार नाही, असे विशेष कृती दलाचे सदस्य डॉ. केदार तोरस्कर यांनी अधोरेखित केले.



**योग्य वापर व्हावा!**

मुंबई पालिकेने नियमावली निर्देशित केली असली तरी समोरील डॉक्टरने दिलेल्या चिठ्ठीवर विश्वास ठेवून रक्तद्रव द्यावा लागतो. परंतु त्या डॉक्टरने योग्य रुग्णाची निवड केली आहे, याची पडताळणी करणे शक्य नाही. मागणी मोठ्या प्रमाणात निर्माण झाल्याने पालिकेतील साठा लगेचच संपू शकतो. राज्याच्या विशेष कृती दलाला प्रत्येक मागणीवर देखरेख करणे शक्य नाही. याचा वापर योग्य रुग्णांवर करणे आवश्यक आहे, ही बाब खासगी रुग्णालये आणि नातेवाईकांनी लक्षात घ्यावी, असे आवाहन पालिकेच्या डॉक्टरांनी केले.

त्यामुळेही मागणी वाढल्याचे पालिका रुग्णालयातील डॉक्टरांनी सांगितले.

गंभीर प्रकृतीच्या रुग्णांच्या शरीरावर संसर्गामुळे आधीच परिणाम झालेला असतो. अशा रुग्णांसाठी रक्तद्रव उपचार उपयुक्त नाहीत. प्रकृती गंभीर होण्याआधीच म्हणजे पाचव्या किंवा सातव्या दिवशी रक्तद्रव देणे आवश्यक आहे. योग्य रुग्णाला योग्य वेळी हे उपचार दिल्यास फायदा होत असल्याचा अनुभव संसर्गजन्य आजारांचे तज्ज्ञ आणि राज्याच्या करोना विशेष कृती दलाचे डॉ. ओम श्रीवास्तव यांनी सांगितला.

**नागपूरसाठी १०० पिशव्या...**

लालबागचा राजा गणेशोत्सव मंडळाचे रक्तद्रवदान शिबीर आणि रुग्णांनी दान केलेला रक्तद्रव यातून जवळपास ३०० पिशव्या जमा झाल्याने याचा वापर अन्य रुग्णालयांत करण्याची परवानगी पालिकेने दिली. त्यामुळे रक्तद्रव मागणीसाठी पालिका रुग्णालयांवर दबाव येत आहे. नागपूरसाठी प्लाटिना प्रकल्पातून मुंबई पालिकेच्या रुग्णालयांतील १०० पिशव्यांची मागणी केली असल्याचे सांगण्यात आले.

## वैद्यकीय ऑक्सिजनचे दर निश्चित!

**मुंबई :** करोना उद्रेकानंतर वैद्यकीय ऑक्सिजनची मागणी देशभरात वाढली आहे. ऑक्सिजनच्या सिलेंडरसह वैद्यकीय द्रवरूप ऑक्सिजनही परवडणाऱ्या किमतीत उपलब्ध होण्यासाठी याचे दर निश्चित करत राष्ट्रीय औषध मूल्य निर्धारण प्राधिकरणाने (एनपीपीए) निर्बंध आणले आहेत.



करोनाकाळात वैद्यकीय ऑक्सिजनची मागणी देशभरात चौपटीने वाढली आहे. परिणामी उत्पादक आणि वितरकांकडून अवाच्या सव्वा किमती आकारल्या जात आहेत. या पार्श्वभूमीवर दरांवर नियंत्रण आणण्यात आले आहे. नव्या दरानुसार उत्पादकांसाठी द्रवरूप ऑक्सिजनचे दर जीएसटीवगळता १५.२२ रुपये प्रति घनमीटर असल्याचे शनिवारी एनपीपीएने जाहीर केले आहे. तर ऑक्सिजनच्या सिलेंडरच्या दरात वाढ करत १७.४९ रुपयावरून २५.७१ रुपये प्रति घनमीटर केले आहेत. आपत्ती व्यवस्थापन कायद्याअंतर्गत दर नियंत्रित केले असून पुढील सहा महिन्यांसाठी हे दर लागू असणार असल्याचे यात नमूद केले आहे.

## डॉ. संजय ओक यांच्याशी करोनाच्या स्थितीबाबत उद्या चर्चा

**लोकसत्ता प्रतिनिधी**



**लोकसत्ता विश्लेषण**

सहभागासाठी येथे नोंदणी आवश्यक
http://tiny.cc/LS_Vishleshan_28Sept

**मुंबई :** गेले सात महिने राज्यात थैमान घालत असलेल्या करोना साथीचा प्रवास, सद्यःस्थिती आणि उपाययोजना याचा आढावा करोना विशेष कृतिदलाचे प्रमुख डॉ. संजय ओक घेणार आहेत. 'लोकसत्ता विश्लेषण'च्या उपक्रमात सोमवारी २८ सप्टेंबर रोजी सायंकाळी ६ वाजता ओक यांच्याशी संवाद साधता येईल.

राज्यात करोना विषाणूने प्रवेश केला तेव्हा याचे निदान, उपचार, विलगीकरण याबाबत अनभिज्ञ असलेले प्रशासन आणि आरोग्य व्यवस्थेला मार्गदर्शन करण्यासाठी मुख्यमंत्र्यांनी राज्य विशेष कृतिदल एप्रिलमध्ये स्थापन केला. याची धुरा मुंबई पालिका प्रमुख रुग्णालयाचे माजी संचालक डॉ. संजय ओक यांच्याकडे सोपविण्यात आली. मुंबईचा वाढता मृत्युदर आटोक्यात आणण्यात, धारावी, मालेगाव येथील संसर्ग नियंत्रणात आणण्यात या दलाची महत्त्वाची भूमिका आहे.

राज्यातील सरकारी रुग्णालयासह खासगी रुग्णालयांना उपचाराबाबतच्या अडचणी सोडवीत मार्गदर्शन करण्यापासून ते वेळेत निदान करण्यासाठी उपाययोजना, विलगीकरण, अलगीकरणाच्या नियमावलीत आवश्यकतेनुसार बदल, औषधांचा वापर यावर सातत्याने बारीक लक्ष ठेवून ठोस पावले दलाने उचलली. दलाचे प्रमुख म्हणून डॉ. ओक यांनी करोना साथीचा हा प्रवास वेगळ्या दृष्टिकोनातून पाहिला आहे. त्यांचा हा अनुभव वेबसंवादातून ऐकता येईल. त्यांनाही करोनाने गाठले होते; परंतु करोनावर मात केल्यावर पुन्हा त्यांनी दलाची सूत्रे हातात घेतली आहेत.

# पालिकेच्या २०० कर्मचाऱ्यांचा करोनाने मृत्यू

### चतुर्थ श्रेणी कामगारांची संख्या अधिक

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**मुंबई :** मुंबई पालिकेच्या विविध विभागांतील सुमारे पाच हजार कर्मचारी आतापर्यंत करोनाबाधित झाले असून त्यापैकी २०० कर्मचाऱ्यांचा मृत्यू झाला आहे. यामध्ये चतुर्थ श्रेणी कर्मचाऱ्यांची संख्या सर्वाधिक आहे.

मुंबई पालिकेत साधारण लाखभर कर्मचारी काम करतात. करोनाचा प्रादुर्भाव सुरू झाल्यापासून पालिकेच्या आरोग्य विभागासह विविध विभागांतील कर्मचारी बाधित झाले आहेत. ही संख्या सतत वाढतच असून, करोनामुळे मृत्यू झालेल्या कर्मचाऱ्यांची संख्याही दिवसेंदिवस वाढत आहे. डॉक्टर, परिचारिका, सफाई कामगार यांच्याबरोबरच अधिकारी, अभियंते, विविध विभागातील कर्मचारी, शिपाई यांना देखील करोनाशी संबंधित कामे देण्यात आली होती.

गेल्या सहा महिन्यांत पालिकेच्या विवध विभागातील कर्मचारी बाधित झाले आहेत. तर अनेकांना आपले प्राण गमवावे लागले आहेत. कर व संकलन विभाग, घनकचरा विभाग, आरोग्य, अग्निशमन, सुरक्षा विभाग अशा विविध विभागातील अधिकारी, कामगार व कार्यालयीन कर्मचारी यांचा मृतांमध्ये समावेश आहे.

**आतापर्यंत पाच हजार कर्मचारी बाधित :** कोविडमुळे आतापर्यंत पालिकेच्या २०० कर्मचाऱ्यांचा मृत्यू झाल्याची माहिती आयुक्त इक्बाल सिंह चहल यांनी 'इंडो- अमेरिकन चेंबर्स ऑफ कॉमर्स'च्या नुकत्याच झालेल्या एका कार्यक्रमात दिली. तर पाच हजार कर्मचारी आतापर्यंत बाधित झाल्याची माहिती त्यांनी दिली. सप्टेंबरच्या पहिल्या आठवड्यापर्यंत १३४ कर्मचाऱ्यांचा करोनाने बळी घेतला होता. तर गेल्या १५ दिवसातच ही संख्या २०० वर गेली आहे.

**५० लाखांचा विमा नाहीच!**

प्रधानमंत्री गरीब कल्याण योजनेंतर्गत कोविड १९ शी सामना करणाऱ्या आरोग्य कर्मचाऱ्यांचा ५० लाखांचा विमा काढण्यात आला आहे. त्याअंतर्गत नुकसान भरपाईसाठी पालिकेने कर्मचाऱ्यांसाठी अर्ज केले असता विमा कंपनीने केवळ आरोग्य विभागातील कर्मचाऱ्यांचेच अर्ज मंजूर केले आहेत.

## देशात दिवसभरात ८५ हजारांहून अधिक करोनाबाधित

**नवी दिल्ली :** देशात गेल्या २४ तासांत ८५ हजारांहून अधिक जणांना करोनाचा संसर्ग झाला असून, एकूण रुग्णसंख्या ५९ लाखांहून अधिक झाली आहे. याच कालावधीत ९३,४२० लोक बरे झाल्याने आतापर्यंत बरे झालेल्यांची एकूण संख्या ४८ लाखांहून अधिक झाली असल्याचे केंद्रीय आरोग्य मंत्रालयाने सांगितले आहे.

एका दिवसात ८,५३६२ लोकांना करोनाचा संसर्ग झाल्याने देशातील करोनाबाधितांची आतापर्यंतची संख्या ५९,०३,९३२ इतकी झाली. २४ तासांच्याच कालावधीत १०८९ लोकांचा मृत्यू ओढवल्यामुळे करोना मृत्यूंचा आकडा ९३,३७९ इतका झाला आहे.

## मुंबईत २४ तासांत २,२८२ रुग्ण

**मुंबई :** मुंबईत शनिवारी २,२८२ करोनाबाधितांची नोंद झाली असून ४४ रुग्णांचा मृत्यू झाला. मुंबईतील एकूण बाधितांची संख्या दोन लाखांनजीक पोहोचली आहे.

मुंबईतील रुग्णवाढीचा वेग गेल्या आठवड्यात काहीसा कमी झाला. मात्र वांद्रे पश्चिम, बोरिवली, अंधेरी पश्चिम, दहिसर, कांदिवली, गोरेगाव या भागांत वेगाने रुग्णवाढ होत आहे.

शनिवारी मुंबईतील १९४२ रुग्ण बरे होऊन घरी गेले. आतापर्यंत १ लाख ५८ हजार ७४९ म्हणजेच ८१ टक्के रुग्ण करोनामुक्त झाले आहेत. सध्या मुंबईत २८,५६८ रुग्ण उपचाराधीन आहेत. एका दिवसात बाधितांच्या संपर्कातील १५ हजार लोक शोधण्यात आले आहेत. त्यापैकी २०८२ जणांना पालिकेच्या विलगीकरण कक्षात ठेवण्यात आले.

## राज्यात १० लाखांपेक्षा अधिक रुग्ण करोनामुक्त

**मुंबई :** राज्यात लागोपाठ चौथ्या दिवशी ४०० पेक्षा अधिक जणांचा करोनामुळे मृत्यू झाला. करोनाचा प्रादुर्भाव झाल्यापासून राज्यात १० लाखांपेक्षा अधिक रुग्ण बरे होण्याचा टप्पा शनिवारी गाठल्याचे आरोग्यमंत्री राजेश टोपे यांनी सांगितले.

गेल्या २४ तासांत राज्यात २०,४१९ नव्या रुग्णांचे निदान झाले तर ४३० जणांचा मृत्यू झाला. याच काळात २३,६४४ रुग्ण बरे होऊन घरी परतले. राज्यातील करोनाबाधित रुग्णांची संख्या १३ लाख २१ हजार झाली असून, यापैकी १० लाख १६ हजार रुग्ण बरे झाले आहेत. एकूण रुग्णांच्या तुलनेत बरे होण्याचे प्रमाण हे ७७ टक्के असल्याची माहिती टोपे यांनी दिली. राज्यात आतापर्यंत करोनामुळे ३५,१९१ जणांचा मृत्यू झाला. राज्यात सध्या २ लाख ६९ हजार रुग्ण उपचाराधीन आहेत.

दिवसभरात नाशिक १५९५, पुणे शहर १७९६, पिंपरी-चिंचवड ११३८, उर्वरित पुणे जिल्हा १३९०, सोलापूर ७०३, सांगली ७७९, सातारा ८४९, नागपूर १६३५ नव्या रुग्णांची नोंद झाली.

## ठाणे जिल्ह्यात १,६३१ नवे रुग्ण

**ठाणे :** जिल्ह्यात शनिवारी १ हजार ६३१ नवे करोना रुग्ण आढळून आले असून, एकूण रुग्णसंख्या १ लाख ६८ हजार ६४५ वर पोहोचली आहे. दिवसभरात ३३ जणांचा करोनामुळे मृत्यू झाला. त्यामुळे एकूण मृतांची संख्या ४ हजार ३३५ इतकी झाली. शनिवारी ठाणे शहरात ४२७, कल्याण-डोंबिवली शहर ३७६, नवी मुंबई शहर ३०९, ठाणे ग्रामीण १९०, मीरा-भाईंदर मध्ये १६४ रुग्ण आढळून आले.

**पश्चिम रेल्वे २ महिला विशेषसह मुंबई उपनगर अनुभागामध्ये ५०६ विशेष उपनगरी सेवा २८ सप्टेंबर २०२० पासून चालविणार आहे**



सामाजिक अंतर राखण्यासाठी आणि अति गर्दी टाळण्यासाठी पश्चिम रेल्वेने **सोमवार, २८ सप्टेंबर २०२०** पासून २ महिला विशेष गाड्यांसह (१ अप आणि १ डाऊन) ५०० वरून ५०६ पर्यंत दैनंदिन उपनगरी सेवा वाढविण्याचा निर्णय घेतला आहे. सर्व प्रवाशांना विनंती करण्यात येत आहे की, लोकल गाड्यांमधून प्रवास करताना सामाजिक अंतर राखावे आणि मुखपट्टी लावावी. सदर विशेष गाड्यांमधून केवळ महाराष्ट्र सरकारद्वारे अधिसूचित करण्यात आलेल्या अत्यावश्यक श्रेणीमधील प्रवास करू शकतील.

**वाढविलेल्या उपनगरीय गाड्यांची महत्त्वाची वैशिष्ट्ये**

* **सेवांच्या संख्येमध्ये वाढ = ०६**
  २ महिला विशेष गाड्यांसह (१ अप आणि १ डाऊन)
  * विरार येथून स. ०७.३५ वा. आणि चर्चगेट येथे ०९.२२ वा. पोहोचेल.
  * चर्चगेट येथून सायं. १८.१० वा. आणि विरार येथे सायं. १९.५५ वा. पोहोचेल.
* **विरार सेक्टरमधील वाढ = ६**
  * विरारपासून ३ सेवा (३ धिम्या) अप दिशेने
  * विरारच्या दिशेने ३ सेवा (३ धिम्या) डाऊन दिशेने
* **सकाळच्या गर्दीच्या वेळेमधील वाढ = २ (अप+डाऊन)**
* **संध्याकाळच्या गर्दीच्या वेळेमधील वाढ = २ (अप+डाऊन)**

**५०६ उपनगरी गाड्यांची विभागणी**

| दरम्यान सेवा | ५०६ सेवांचा तपशील | | |
|---|---|---|---|
| | अप | डाऊन | एकूण |
| विरार - चर्चगेट | ११६ | १२१ | २३७ |
| विरार - बोरिवली | ६ | ४ | १० |
| नालासोपारा - चर्चगेट | ३ | -- | ३ |
| वसई रोड - चर्चगेट | २ | -- | २ |
| वसई रोड - बोरिवली | -- | २ | २ |
| महालक्ष्मी - बोरिवली | -- | ७ | ७ |
| बोरिवली - चर्चगेट | १०७ | १०२ | २०९ |
| डहाणू रोड - चर्चगेट | ४ | ४ | ८ |
| डहाणू रोड - बोरिवली | १ | १ | २ |
| डहाणू रोड - विरार | १३ | १३ | २६ |
| एकूण | २५२ | २५४ | ५०६ |

पश्चिम रेल्वे
www.wr.indianrailways.gov.in
आम्हाला लाइक करा: facebook.com/WesternRly
आम्हाला फॉलो करा: twitter.com/WesternRly

DREDGING CORPORATION OF INDIA LIMITED
PROJECT OFFICE: 101-A, WITTAL CHAMBERS, NARIMAN POINT, MUMBAI -400021.
**REQUIREMENT OF FULLY FURNISHED OFFICE ON LEASE**
DCI inviting tenders for fully furnished Air conditioned Office at Navi-Mumbai areas. For more details please visit www.dredge-india.com/www.dredge-india.gov.in/http://e-procure.gov.in
Contact: Shri. K. Swarup Kumar Babu, Dy. Manager (HR) Mob: +91 9550133144.

**सावंतवाडी नगर परिषद, सावंतवाडी**
E-mail - cosawantwadi@gmail.com Ph. 02363-272044, 272588
जा.क्र. बांध./१४४०/२०२०-२१ दि. २४.०९.२०२०
**संक्षिप्त ई-निविदा सूचना क्र. ७ सन २०२०-२१**
मुख्याधिकारी, सावंतवाडी नगर परिषद, नगर परिषदेच्या नाथ पै बहुउद्देशीय सभागृह दर्जावाढीची कामे करणे (सिव्हिल वर्क) या कामांसाठी मान्यताप्राप्त व पात्र ठेकेदारांकडून ई-निविदा पद्धतीने शतवार दराच्या निविदा मागवीत आहेत.
निविदा ऑनलाइन भरण्याचा अंतिम दि. २१.१०.२०२० रोजी १५.०० वाजेपर्यंत व निविदा उघडण्याचा दि. २२.१०.२०२० रोजी १५.०५ वा. असा आहे. (शक्य झाल्यास किंवा प्रशासकीय सोयीनुसार)
कामाबाबत संपूर्ण माहिती www.mahatenders.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.
सही/-
चीफ ऑफिसर
सावंतवाडी नगर परिषद

**समुद्री उत्पाद निर्यात विकास प्राधिकरण (एमपीईडीए)**
(वाणिज्य आणि उद्योग मंत्रालय, भारत सरकार)
THE MARINE PRODUCTS EXPORT DEVELOPMENT AUTHORITY (MPEDA)
Ministry of Commerce and Industry, Government of India
एमपीईडीए क्षेत्रीय विभाग, पनवेलच्या आर्थिक सहाय्याने एस.सी./एस.टी. मत्स्यसंवर्धकांकरीता निर्यातक्षम वैविध्यपूर्ण प्रजाती जसे की खेकडे / जिताडा / तिलापिया / गोडया पाण्यातील कोळंबी संवर्धनाचे प्रात्यक्षिक करण्याचा विचार करत आहे.
प्रात्यक्षिक आयोजित करण्यासाठी इच्छुक संवर्धकांकडून अर्ज आमंत्रित करीत आहे.
अधिक माहीतीसाठी, समुद्री उत्पाद निर्यात विकास प्राधिकरण,
क्षेत्रिय विभाग, ४था माळा, ट्रायफेड टॉवर, सेक्टर १७, खांदा कॉलनी,
न्यू पनवेल ४१०२०६; संपर्क क्रमांक ०२२-२७४८१४८१, ई-मेल: rc.pan@mpeda.gov.in
०५.१०.२०२० या तारखेपूर्वी इच्छुक संवर्धकांनी अर्ज कार्यालयामध्ये पाठवावेत.

भारत सरकार
अणू ऊर्जा विभाग
**भाभा अणू संशोधन केंद्र**
तांत्रिक सेवा विभाग,
उत्तर साइट, ट्रॉम्बे, मुंबई-४०० ०८५.
**ई-निविदा मागविणारी सूचना**
भारताच्या राष्ट्रपतींच्या वतीने मुख्य अभियंता, तांत्रिक सेवा विभाग, भाभा अणू संशोधन केंद्र, उत्तर साइट, बीएआरसी, ट्रॉम्बे, मुंबई-४०००८५ हे खालील कामाकरिता द्वि-बोली पद्धतीत ऑनलाइन बाब दर निविदा मागवीत आहेत :-
**एनआयटी नं. बीएआरसी/टीएसडी/१६६/२०२०-२१. कामाचे नाव :** ट्रॉम्बे, मुंबई-८५, टाटापासून ते बीएआरसी लाइन नं. ४ पर्यंत १३२ केव्ही एक्सएलपीई केबलच्या जॉइंट्सद्वारा स्ट्रेट व एंड टर्मिनेशन. **अंदाजित खर्च :** रु. ७८,००,०००/-. **इसारा रक्कम :** रु. १,५६,०००/-. **पूर्तता कालावधी :** १२ महिने. **बोलीच्या सादरीकरणाची शेवटची तारीख व वेळ :** २६.१०.२०२० (२३.५९ वा.).
बोली प्रपत्रे व अन्य तपशील www.tenderwizard.com/DAE किंवा www.barc.gov.in या संकेतस्थळांवरून प्राप्त करता येईल.
वरील निर्धारित तारखा, इ. संबंधित बदल, जर असल्यास, केवळ www.tenderwizard.com/DAE या संकेतस्थळावरच अधिसूचित करण्यात येईल.
साहाय्य/स्पष्टीकरणे याकरिता संपर्क २४×७@९९६९३९५५२२
**श्री. रुद्रेश, ईमेल : rudresh.tenderwizard@gmail.com**
मुख्य अभियंता

**MBBS**
Ministry Of Health Of Russia
**SMOLENSK STATE MEDICAL UNIVERSITY, RUSSIA**
**100 YEARS ANNIVERSARY 1920-2020**
**Invites Indian students for direct Government Admissions**
**Recognized by India, WHO, USA & UK, Min. Qual. 50% in XII in PCB**
**UNIVERSITY** - Founded in 1920, International Rating 22nd, situated in center of city of Smolensk, Smolensk is situated 380 km west of Moscow, Very high standards of education, English Medium in all years, strict disciplinary system. **1350** Indian students (**500** Girls) studying, **162** got degree in **2020** Closed type campus system, **8** attached hospitals (**6000** Beds).
**MCI SCREENING TEST** – Our graduates of **2008** to **2019** have given **BEST** results among graduates of all foreign medical colleges (Official web sites of Indian Embassy, Moscow and National Board of Examination, New Delhi who conducts MCI Screening Test confirm this).
**SPECIAL HOSTELS ONLY FOR INDIAN STUDENTS (BEST HOSTELS IN RUSSIA)** 2 and 4 seated big rooms, separate hostels for boys and girls.
**INDIAN MESS** - Mess with **Indian food** cooked by **Indian cooks**.
**Fee** (Tuition+Hostel+Med.Ins.) – **USD 6000** (Approx. Rs. 4,50,000/-) per year and one time payment of Rs.1,50,000/- (By Bank Draft only) which includes – Admission procedure, invitation letter, student visa, air ticket Delhi - Moscow.
**100 Years Anniversary Scholarship to all Indian students.**
Bank loans from Indian banks are available.
Contact Foreign advisor to Chancellor: Dr.Alok Aeron+79605805555(Russia)
**Official web site: www.sgmu.info DM us on insta: @sgmu.info**
**Admission details: admission2020.sgmu.live**
**INFORMATION CENTERS (Parents of Students or Our Graduates):**
**Ghatkopar:** Mr. Khair - 8097225022, **Andheri:** Mr. Shinde – 8286666526
**Virar:** Dr. Kapadia – 9764532233, **Borivali:** Mrs. Pimple – 9987249347
**Wadala:** Mr. Jain – 8767394610, **Kalyan:** Dr. Das – 7756907910
**Airoli:** Mr. Rawat - 9920285979, **Kharghar:** Dr. Neurekar – 7738722206
**Nashik:** Mr. Thorat – 9112969724, **Nashik:** Dr. Shinde – 9373315693

**सीजी पॉवर अॅण्ड इंडस्ट्रियल सोल्यूशन्स लिमिटेड**
CIN No.: L99999MH1937PLC002641
नोंदणीकृत कार्यालय: ६वा मजला, सीजी हाऊस, डॉ. अॅनी बेझंट मार्ग, वरळी, मुंबई – ४०० ०३०.
फोन नं.: ०२२-२४२३ ७७७७, फॅक्स नं.: ०२२ २४२३ ७७३३
ईमेल: investorservices@cgglobal.com, वेबसाइट: www.cgglobal.com

**कंपनीच्या ८३व्या वार्षिक सामान्य सभेची सूचना**

**ह्याद्वारे सूचना दिली जात आहे की:**

कंपनीची ८३व्या वार्षिक सामान्य सभा ('**एजीएम**') व्हिडिओ कॉन्फरन्स ('**व्हीसी**')/इतर ऑडिओ विजूअल माध्यमांद्वारे ('**ओएव्हीएम**') **सोमवार, १९ ऑक्टोबर २०२० रोजी दुपारी ३.०० वाजता** आयोजित होणार असून त्यात एजीएम कळवणाऱ्या दिनांक १६ सप्टेंबर २०२० च्या सूचनेतील कामकाज पार पाडले जाईल. सभेचे स्थान कंपनीचे नोंदणीकृत कार्यालय: ६ वा मजला, सीजी हाउस, डॉ. एनी बेझंट रोड, वरळी, मुंबई–४०० ०३० असल्याचे गृहीत धरले जाईल.

कोविड–१९ ह्या जागतिक महामारीमुळे सामाजिक अंतर पाळणे आवश्यक आहे आणि देशातील विविध स्थानांवर व्यक्तींच्या हालचालींवर नियंत्रण आले आहे व कॉर्पोरेट अफेअर्स मंत्रालयाने (**एमसीए**) जारी केलेल्या दिनांक ८ एप्रिल २०२०, १३ एप्रिल २०२० आणि ५ मे २०२० च्या परिपत्रकांनुसार (ज्यांना एकत्रितपणे '**एमसीए परिपत्रके**' म्हटले आहे) आणि सिक्युरिटीज अँड एक्सचेंज बोर्ड ऑफ इंडियाने जारी केलेल्या दिनांक १२ मे २०२० च्या परिपत्रक क्रमांक सेबी/एचओ/सीएफडी./सीएमडी १/सीआयआर/पी/२०२०/७९ नुसार ('**सेबी परिपत्रक**') ८ सप्टेंबर २०२० रोजी कंपनीच्या रजिस्ट्रार ऑफ महाराष्ट्र, मुंबईने पारित केलेल्या ऑर्डरच्या अनुषंगाने ३१ डिसेंबर, २०२० पर्यंत वार्षिक सर्वसाधारण सभा घेण्यासंबंधी कंपन्यांना सर्वसाधारण सूट देण्यात आली आणि कंपनी अॅक्ट २०१३ ('कायदा') च्या तरतुदींचे पालन केले. भारतीय सिक्युरिटीज आणि एक्सचेंज बोर्ड ऑफ इंडिया (लिस्टिंग ओब्लिगेशन्स एंड डिस्क्लोजर आवश्यकता) विनियम, २०१५ ('सेबी एलओडीआर'), २०१९–२० आर्थिक वर्षाच्या अहवालासह एजीएमची नोटीस पाठविली आहे. डिपॉझिटरी सहभागी (एक/अनेक)/कंपनी/रजिस्ट्रार आणि भाग हस्तांतरण प्रतिनिधी (**आरटीए**) म्हणजे डेटामॅटिक्स बिझनेस सोल्यूशन्स लिमिटेड (आधीचे नाव: डेटामॅटिक्स फायनान्शिअल सर्व्हिसेस लिमिटेड) ह्यांच्याकडे ईमेल पत्ते नोंदवलेल्या कंपनीच्या सदस्यांना इलेक्ट्रॉनिक पध्दतीने पाठवली आहे. इलेक्ट्रॉनिक पध्दतीने वार्षिक अहवाल आणि एजीएमची सूचना पाठवणे आणि ई–मतदानाची माहिती देण्याचे काम दिनांक २६ सप्टेंबर २०२० रोजी पूर्ण झाले आहे. दूरस्थ ई–मतदान आणि ई–मतदानाची प्रक्रिया आणि पध्दत ह्यासह वार्षिक अहवाल आणि एजीएमची सूचना कंपनीच्या *www.cgglobal.com* वेबसाइटवर स्टॉक एक्सचेंजेसच्या म्हणजे बीएसई लिमिटेड आणि स्टॉक एक्सचेंज ऑफ इंडिया लिमिटेड व नॅशनल सिक्युरिटीज डिपॉझिटरी लिमिटेड (**एनएसडीएल**) च्या *www.evoting.nsdl.com* वेबसाइटवर उपलब्ध आहे.

कंपनी कायदा २०१३ च्या कलम १०८ मधील तरतुदी ह्या, वेळोवेळी बदलणाऱ्या, कंपनीज (मॅनेजमेंट अँड अॅडमिनिस्ट्रेशन) नियम २०१४ (नियम) च्या नियम २०, सिक्युरिटीज अँड एक्सचेंज बोर्ड ऑफ इंडिया (लिस्टिंग ऑब्लिगेशन्स अँड डिस्क्लोजर रिक्वायरमेंट्स) नियम २०१५ च्या नियम ४४ आणि इन्स्टिट्यूट ऑफ कंपनी सेक्रेटरीज ऑफ इंडियाने जारी केलेल्या सेक्रेटरियल स्टॅंडर्ड–२ (**एसएस–२**) सोबत वाचल्या असता त्या अन्वये, कंपनीला एनएसडीएलद्वारे *www.evoting.nsdl.com* येथे इलेक्ट्रॉनिक मतदान सुविधा पुरवताना आनंद होत आहे, ज्यामुळे सदस्यांना एजीएममध्ये होणाऱ्या कामकाजावर इलेक्ट्रॉनिक माध्यमातून मत देता येईल.

नियम, एसएस–२ आणि एमसीए परिपत्रकांसोबत कायदा वाचला असता, त्यानुसार तपशील खाली दिला आहे:

क) **सोमवार, १२ ऑक्टोबर २०२० ('समाप्ती तारीख')** नुसार, एजीएमवर रिमोट ई–मतदान किंवा ई–मतदानाद्वारे मतदानाचा हक्क वापरण्यास पात्र असणारे सदस्य, भौतिक स्वरूपात किंवा डिमटेरियलाइझ फॉर्ममध्ये समभाग धारण करणारे सदस्य फक्त एजीएमवर रिमोट ई–मतदान किंवा ई–मतदानाद्वारे पात्र असतील. जी व्यक्ती समाप्ती तारखेला सदस्य नाही त्याने एजीएमच्या या सूचनेची माहिती केवळ माहितीच्या उद्देशानेच दिली पाहिजे.

ख) **ईमेल पत्ता नोंदवण्याची/अद्ययावत करण्याची पध्दत:**

i) जर भौतिक स्वरूपात भागधारणा करण्यात आली असेल तर कृपया आरटीएला cginvestors@datamaticsbpm.com वर ईमेलद्वारे विनंती पाठवा, सोबत फोलिओ क्रमांक, भागधारकाचं नाव, भाग प्रमाणपत्राची स्कॅन केलेली प्रत (पुढील व मागील भाग), पॅन (पॅन कार्डाची स्वयं प्रमाणित केलेली प्रत), आधार (आधार कार्डाची स्वयं प्रमाणित केलेली प्रत) पाठवा.

ii) जर समभाग डिमॅट मोडमध्ये असतील तर सदस्यांना त्यांचा ईमेल पत्ता, पॅन आणि बँक खात्याचा तपशील डिपॉझिटरी सहभागीकडे नोंदवावा / अद्ययावत करावा अशी विनंती केली जाते जिथे त्यांची संबंधित डिमटेरियलाइज्ड खाती ठेवली जातात.

ग) **ई–मतदानाद्वारे मत देण्याची पध्दत:**

ई–मतदान प्रणालीद्वारे एजीएमच्या सूचनेत नमूद केल्याप्रमाणे सदस्यांना कामकाजावर दूरस्थ ई–मतदानाद्वारे (दूरस्थ ई–मतदान) मतदान करण्याची संधी असेल. दूरस्थ ई–मतदान आणि ई–मतदानाद्वारे मते टाकण्यासाठी लॉगिन प्रमाणपत्रे सदस्यांना उपरोक्त पद्धतीने ईमेल पत्त्याची यशस्वीरित्या नोंदणी केल्यानंतर ईमेल मार्गे उपलब्ध असतील. ई–मतदानाद्वारे मते टाकण्याची सविस्तर पध्दत एजीएमच्या सूचनेत सांगितली जाईल. त्याचा तपशील कंपनीच्या वेबसाइटवरही उपलब्ध करुन दिला जाईल.

घ) दूरस्थ ई–मतदान **गुरुवार, १५ ऑक्टोबर २०२० रोजी सकाळी ९.०० वाजता (भारतीय प्रमाणवेळ) सुरू होईल आणि रविवार, १८ ऑक्टोबर २०२० रोजी सायंकाळी ५.०० वाजता (भारतीय प्रमाणवेळ)** समाप्त होईल.

च) त्यानंतर एनएसडीएलद्वारे मतदानासाठी रिमोट ई–मतदान मॉड्यूल खंडित केले जाईल आणि रिमोट ई–मतदानाद्वारे मतदान करण्यास परवानगी दिली जाणार नाही. एकदा ठरावावर मत दिल्यानंतर सदस्याला त्यानंतर ते बदलण्याची परवानगी दिली जाणार नाही.

छ) एजीएममध्ये उपस्थित असलेले सदस्य ज्यांनी दूरस्थ ई–मतदानाद्वारे मत दिले नाही ते सदस्य एजीएम दरम्यान ई–मतदानाद्वारे मतदान करण्यास पात्र ठरतील. एजीएमपूर्वी ज्या सदस्यांनी आधीच रिमोट ई– मतदानाद्वारे मत दिले आहे ते एजीएममध्ये देखील उपस्थित राहू शकतात आणि भाग घेऊ शकतात परंतू त्यांना एजीएमवर मत देता येणार नाही.

ज) जे सदस्य एजीएममध्ये व्हीसी/ओएव्हीएम सुविधेद्वारे उपस्थित असतील आणि त्यांनी ठरावावर दूरस्थ ई–मतदानाद्वारे मत दिलं नसेल आणि त्यांना प्रतिबंधित केलं नसेल तर ते एजीएम दरम्यान दूरस्थ ई–मतदानाद्वारे मत देऊ शकतील.

झ) सदस्यांचे मतदानाचे हक्क समाप्ती तारखेनुसार कंपनीच्या पेड अप इक्विटी शेअर भांडवलाच्या समभागांच्या प्रमाणात असतील. इलेक्ट्रॉनिक पद्धतीने एजीएमची सूचना पाठवल्यानंतर आणि समाप्ती तारखेला समभाग असल्यास कोणतीही व्यक्ती, कंपनीचे शेअर्स अधिग्रहण करते आणि त्याचा सदस्य बनते, तेव्हा एनएसडीएल *evoting@nsdl.co.in* वर विनंती पाठवून यूएसआय आयडी व पासवर्ड मिळवू शकते. तसेच, जर एखाद्या व्यक्तीची दूरस्थ ई–मतदानासाठी आधीच एनएसडीएलवर नोंद झालेली असेल तर ती सध्याचा यूझर आयडी आणि पासवर्ड वापरून आपलं मत देऊ शकते.

ञ) श्री. प्रशांत एस मेहता (सदस्यत्व क्रमांक ACS ५८१४), मेसर्स प्रोप्रायटर पी मेहता आणि असोसिएटस, प्रॅक्टिसिंग कंपनी सेक्रेटरीज (सी.पी. क्रमांक १७३४१), यांना परिनिरिक्षक म्हणून ने ले असून ते एजीएम दरम्यान दूरस्थ ई–मतदान आणि ई–मतदान प्रक्रियेची योग्य आणि पारदर्शक पध्दतीने छानबीन करतील

ट) एजीएम दरम्यान दूरस्थ ई–मतदान आणि ई–मतदान आणि व्हीसी/ओएव्हीएमद्वारे सहभाग याची तपशीलवार माहिती मिळवण्यासाठी सदस्य एजीएम सूचना पाहू शकतात. कृपया, एनएसडीएलच्या *www.evoting.nsdl.com* ई–मतदान वेबसाइटवर डाउनलोड विभागात सदस्यांसाठी उपलब्ध असलेलं 'ई–वोटिंग यूझर मॅन्यूअल' पहा. ई–मतदान प्रक्रियेसंबंधी कोणतीही शंका/तक्रार असेल किंवा एजीएम दरम्यान एजीएममध्ये उपस्थित राहाताना कोणतीही मदत हवी असेल तर तुम्ही यांना संपर्क करू शकता:

१. **ई–मतदानासाठी:**
   i) श्रीमती पल्लवी म्हात्रे, व्यवस्थापक, एनएसडीएल pallavid@nsdl.co.in / ०२२–२४९९४५४५
   ii) श्रीमती सरिता मोटे, उप व्यवस्थापक, एनएसडीएल saritam@nsdl.co.in /०२२–२४९९४५४७.

२. **व्हीसी/ओएव्हीएमसाठी:**
   i) श्री. सागर घोसाळकर, उप व्यवस्थापक, एनएसडीएल sagar.ghosalkar@ nsdl.co.in / ०२२–२४९९४५५३
   ii) श्री. अमित विशाल, ज्येष्ठ व्यवस्थापक–एनएसडीएल amitv@nsdl.co.in / ०२२–२४९९४३६०

सदस्य कंपनीच्या कंपनी सचिवांनाही नोंदणीकृत कार्यालयात लिहू शकतात किंवा ईमेल करा: *investorservices@cgglobal.com*.

**सीजी पॉवर अॅण्ड इंडस्ट्रियल सोल्यूशन्स लिमिटेडसाठी**

अॅलेन फर्न्स
कंपनी सचिव आणि अनुपालन अधिकारी
सदस्यता क्रमांक: ३०६३३
मुंबई, २६ सप्टेंबर २०२०